**E**
**Batch- 2021-22**

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## बी. ए. – (विशारद) सामाजिकशास्त्रे

**परीक्षा : डिसेंबर – २०२३**

**तृतीय वर्ष**

**सत्र – ६**

**विषय:– साहित्यातून समाजदर्शन (भाग–२) (HDSE-603)**

---

**दिनांक:** १९/१२/२०२३ **गुण :** १०० **वेळ :** दु. २.०० ते दु. ५.००

---

**सूचना :** सर्व प्रश्न सोडवा.

---

**प्रश्न १ दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा (कोणतेही दोन)** **(४०)**

१. भारतीय लोकशाहीच्या मार्गातील कोणते अडथळे रावसाहेब पटवर्धनांनी सांगितले आहेत?

२. प्र. के. अत्रे यांच्या आत्मचरित्रात्मक लेखनामधून तत्कालीन पुण्याची कोणती वैशिष्ट्ये स्पष्ट होतात?

३. एकोणिसाव्या शतकाच्या पार्श्वभूमीवर रखमाबाईंनी दाखवलेली कर्तबगारी स्पष्ट करा.

४. भारतीय लोकशाहीचे अस्तित्व टिकवण्यासाठी कोणती पथ्ये आपण पाळली पाहिजेत?

**प्रश्न २ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **(३०)**

१. इंग्रजी भाषेचे शिक्षणक्षेत्रातील आक्रमण अधिक गंभीर आहे असे शिरवाडकरांना का वाटते?

२. 'इंडिया' आणि 'भारत' ह्या संज्ञा शरद जोशींनी कोणत्या अर्थाने वापरल्या आहेत?

३. 'वेठीच्या आसाचा फेरा' या पाठामधून दिसून येणाऱ्या आदिवासींच्या समस्यांचे वर्णन करा.

४. दलित साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

५. बटाट्याच्या चाळीमधील बिऱ्हाडकरूंच्या जीवनातील परिवर्तनाचा आढावा घ्या.

**प्रश्न ३ टीपा लिहा. (कोणत्याही दोन)** **(३०)**

१. शरद जोशींनी दाखविलेला 'मध्ययुगीन साम्राज्यवाद' व 'वसाहतवाद' यातील फरक

२. 'दुपारची शाळा' या पाठातील कैकाडी समाजाच्या जीवनपद्धतीचे वर्णन करा

३. 'खेडे' आणि 'शहर' यातील प्र. के. अत्रे यांना जाणवणारा फरक

४. पु. ल. देशपांडे : लेखक परिचय

---